# प्रकरण पहिले

## सेतुमाधवराव पगडी

### जीवनपट

भारतात आलेल्या युरोपिय इतिहासकारांनी इतिहास लिहिण्याची प्रक्रिया सुरू केली. स्प्रिंगल, ग्रँट डफ, रॉलीन्सन, एल्फिस्टन, इलियट, डाऊसन इत्यादी इतिहासकारांनी आपल्या लिखाणातून मराठ्यांचा इतिहास शास्त्रशुध्द पध्दतीने लिहिण्याचा प्रयत्न केला. तरीसुध्दा युरोपिय इतिहासकारांनी साम्राज्यवादी दृष्टीकोनातून मराठ्यांचा इतिहास लिहिल्यामुळे तो पूर्वग्रहदूषित स्वरूपाचा लिहिला गेला अशी टीका केली जात होती. म्हणून पाश्चात्य शिक्षण आणि राष्ट्रवादी भावनेने प्रेरित झालेले काही महाराष्ट्रीय इतिहासकार मराठ्यांच्या इतिहास संशोधनाच्या कामाला लागले.

महाराष्ट्रात राजवाडे, खरे, सरदेसाई, शेजवलकर, न्या.रानडे, दत्तो वामन पोतदार इत्यादी नामवंत व निष्ठावंत इतिहास संशोधकांनी इतिहास लेखनाची व ऐतिहासिक साधने संकलीत करण्याची जी थोर आणि उज्ज्वल परंपरा निर्माण केली त्या परंपरेतील सेतुमाधवराव पगडी (१९१०-१९९४) हे एक इतिहास संशोधक मानले जातात.

काशिनाथ नारायण साने ( १८५१-१९२७), वासुदेव सिताराम बेन्द्रे (१८९३-१९८६), गोविंद सखाराम सरदेसाई (१८६५-१९५९), विश्वनाथ काशिनाथ राजवाडे (१८६४-१९२६), दत्तात्रय बळवंत पारसनीस (१८७०-१९२६), त्र्यंबक शंकर शेजवलकर (१८९५-१९६३), गणेश हरी खरे (१९०१-१९८५), दत्तो वामन पोतदार (१८९०-१९७९) इत्यादी संशोधकांनी मराठ्यांचा इतिहास मोठ्या प्रमाणात प्रकाशात आणला. या सर्व इतिहासकारांनी मराठ्यांच्या इतिहास संशोधनासाठी मराठी, इंग्रजी, संस्कृत, फ्रेंच, डच व पोर्तुगीज भाषांतील उपलब्ध साधनांचा वापर केलेला आहे. तरीसुध्दा फारसी

साधनांकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. फारसी साधने जरी परकीय असली तरी त्यांचा योग्य व सावध वापर केल्यास मराठ्यांच्या इतिहासावर महत्वाचा प्रकाश टाकता येतो, हे यदुनाथ सरकार व गणेश हरी खरे यांनी दृष्टीस आणून दिले.

मराठ्यांच्या इतिहासावर भरपूर प्रकाश टाकू शकणारे मुघल फारसी साहित्य उपलब्ध असूनही फारसी भाषेचे ज्ञान मराठ्यांच्या इतिहास संशोधनातील मोठा अडसर होता. हा अडसर दूर करण्याचे अत्यंत मोलाचे कार्य सेतुमाधवराव पगडी यांनी केले आहे. पगडी हे अनेक भाषांचे पंडित होते. फारसी ही तर त्यांची आवडती भाषा होती.

सेतुमाधवराव पगडी हे महाराष्ट्रातील सुप्रसिध्द इतिहासकार, नामवंत लेखक व प्रसिध्द वक्ते होते. इतिहास संशोधनासाठी लागणारी विद्वता, श्रोत्यांना एकाच ठिकाणी तासन्तास खिळवून ठेवणारी त्यांची वक्तृत्व शैली इत्यादी गुणांचा सुरेख समन्वय पगडी यांच्या व्यक्तिमत्वात दिसून येतो.

प्रशासकाच्या खुर्चीत बसलेले असतानाही त्यांनी त्यांच्या आवडीच्या इतिहास विषयाच्या संशोधनाकडे दुर्लक्ष केले नाही. शासकीय सनदी नोकरीत राहून इतिहासाच्या संशोधनकार्यात जीवन व्यतीत करणारे जे काही थोडे इतिहास संशोधक होऊन गेले त्यात सेतुमाधवराव पगडी यांचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो.

हैद्राबादसारख्या मुस्लीम संस्कृतीच्या संस्थानात, जटील वातावरणात, कौटुंबिक जबाबदाऱ्या पेलत, प्रतिकूल परिस्थितीशी सामना करीत त्यांनी इंग्रजी, तेलगू, फारसी, कन्नड, गौंड इत्यादी भाषा आत्मसात केल्या.

सेतुमाधवराव पगडी यांचा महाराष्ट्रास नव्याने परिचय करून देण्याचे कारण नाही. इतिहास हा त्यांच्या आवडीचा विषय. सूफी तत्वज्ञानासारखा

विषयही त्यांना चालतो. फार काय, कोणताच विषय त्यांच्या प्रतिभेला नावडता नव्हता.

सेतुमाधवरावांनी व्याख्यानांच्या निमित्ताने साऱ्या भारताचे भ्रमण केले. राजकारण, इतिहास - भारताचा आणि जगाचा, संस्कृती - आज, काल व उद्या, संत वाङ्मय संप्रदाय इत्यादी विषयांचे अवगाहन करण्यात त्यांना आनंद वाटत होता.

सेतुमाधवराव पगडी ह्यांचे जीवन म्हणजे वाहती ज्ञानगंगा होती. ८५ व्या वर्षी त्यांना दिसत नव्हते तरी सुध्दा त्यांची ज्ञानलालसा कमी झाली नव्हती. या वयात सुध्दा ते दिवसभरात ५-७ तास तरी ते वाचून घेणे, डिक्टेट करणे चालूच होते.

सेतुमाधवराव पगडी हे धीरोदात्त, विजयी, सुसंस्कृत, पंडित, सन्माननीय, स्थितप्रज्ञ, सर्वांशी प्रेमाने वागणारे व ज्ञान देणारे इतिहास संशोधक होते.

प्राचीन,अर्वाचीन इतिहासाशी सेतुमाधवराव पगडी यांचे नांव अभेद्यपणे जोडले गेले आहे. त्यांच्या ग्रंथ संग्रहाची व्याप्ती मोठी होती. आपला व्यासंग स्वत:पुरता मर्यादित न ठेवता त्यांनी तो मराठी आणि इंग्रजीतील असंख्य वाचकांपर्यंत सोप्या भाषेत पोहोचवला.

आशावाद आणि सामाजिक बांधिलकी हा सेतु-माधवरावांचा गुणधर्म होता. साहित्य हा इतिहासाप्रमाणेच त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. समोरची व्यक्ती किंवा घटना इतिहासकालीन असो की आताची, तिची परीक्षा ते सारख्याच हुरूपाने करत. म्हणूनच त्यांच्या इतिहास कथनाला रूक्षपणा येत नाही. रसाळपणा हा त्यांच्या लेखनाचा स्थायी भाव आहे आणि

इतिहास तज्ज्ञ असल्यामुळे त्याला नेमकेपणाची जोड मिळाली आहे. याच गुणांमुळे त्यांचे लेखन वेधक बनते व चिंतनशील देखील. सेतुमाधवराव पगडी यांचे इतिहास विषयक लेखनाचा आढावा घेत असताना त्यांचा जीवनपट अभ्यासणे उद्बोधक ठरते.

## जन्म, बालपण व शिक्षण

सेतुमाधवराव पगडी यांचा जन्म महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात निलंगा या ठिकाणी २७ ऑगस्ट १९१० रोजी शनिवारी झाला. तो दिवस गोकुळ अष्टमीचा होता. त्यांचे वडील श्रीनिवासराव निलंगा येथे मामलेदार कचेरीत पेशकार (अव्वल कारकून ) होते. आईचे नांव कृष्णाबाई असून, त्यांच्या वडिलांची ती दुसरी पत्नी होती. प्लेगच्या साथीत पहिली पत्नी वारल्यामुळे त्यांनी दुसरे लग्न केले. तीच ही कृष्णाबाई होय. तिचे माहेर बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात मांजरा नदीच्या काठी मांगवडगावचे '' चंद्रस '' घराणे.[१]

सेतुमाधवरावांच्या लहानपणी त्यांच्या घरी नेहमी धार्मिक कार्ये होत असत. सेतुमाधवराव यांच्या वडिलांची आर्थिक स्थिती चांगली होती. त्यामुळे शिक्षण सुध्दा त्यांना सहजपणे मिळाले. मात्र वडिलांच्या सारख्या बदल्या होत असल्यामुळे सुरूवातीचे शिक्षण धावपळीचे झाले. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोंडवल, गुलबर्गा, उस्मानाबाद व हैदराबाद इत्यादी ठिकाणी झाले, तर त्यांचे उच्च शिक्षण पुण्यास झाले. ते इ.स. १९२५ मध्ये मॅट्रीक, इ.स. १९३० मध्ये बी.ए. आणि इ.स. १९३२ मध्ये एम्.ए. अलाहाबाद विद्यापीठातून पास झाले. प्राध्यापक व्हायची त्यांची इच्छा होती. परंतु ते तहसिलदार झाले.

ते माध्व संप्रदायी वैष्णव. दक्षिण कानडा जिल्ह्यात उडुपीचे बाळकृष्णाचे देऊळ हे त्यांचे तीर्थस्थान. महाभारत, भागवत या पुराणांची गोडी त्यांना घरच्या वातावरणामुळे लागली. त्यांचे वडील सरकारी कामाच्या वेळेखेरीज आपला सगळा वेळ पूजापाठ, अनुष्ठाने, व्रते, वैकल्ये, पुराणश्रवण, हरिकिर्तन यातच घालवित असत. निलंग्याला वडिलांनी स्वत: शेकडो रूपये खर्च करून आणि हजारोंच्या वर्गण्या करून दोन देवळे बांधली. एक मध्वमंदिर व दुसरे कृष्णमंदिर. वडिलांच्या व्यक्तिमत्वाचा सेतुमाधवरावांच्या मनावर खोल ठसा उमटलेला होता.

पगडी यांचे घराणे मूळचे महाराष्ट्रातील वाईचे. पगडी यांचे पूर्वज नोकरी निमित्ताने पेशवाईच्या काळात कर्नाटकात स्थायिक झाले. त्यांच्या कर्तृत्वामुळे त्यांना तेथे इनामे व जहागिरी मिळाल्या.[२]

## पगडी आडनांवाचा इतिहास

सेतुमाधवराव पगडी यांच्या पूर्वजांना लाभलेल्या पगडी या आडनांवाचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. पगडी आपल्या आत्मचरित्रात लिहितात......

'' माझे पणजोबा आनंद गोपाळ पंत यांनी स्वकर्तृत्वावर कर्नाटकातील गुलबर्गा जिल्ह्यातील कारजोळ या गावी जमिनी मिळविल्या व एक मोठा वाडा बांधून तेथेच स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. कारजोळ गावाचे जहागिरीचे काम त्यांच्याकडे असल्यामुळे तेथील जकात वसूल करण्याचा हक्क व अधिकार त्यांना प्राप्त झाला. जकात वसुलीच्या कामामुळे त्यांचे पंत हे मूळचे

आडनांव मागे पडून " जकाते" हे टोपण नांव त्यांना लाभले व पुढे तेच जनमानसात रूढ झाले. कारजोळच्या जुन्या महसूल दप्तरात त्यांच्या " जकाते" या आडनांवाचाच उल्लेख सापडतो. आनंद गोपाळपंतांना वासोपंत व शेषगिरीराव ही दोन मुले होती. त्यापैकी वासोपंत कारजोळ गावींच राहिले. आणि शेषगिरीराव यांनी निजामी राजवटीत सरकारी नोकरी पत्करून रायचूर जिल्ह्यांत स्थलांतर केले. शेषगिरीराव हे आपल्या डोक्यावर चिपळूणकर पगडी सातत्याने धारण करीत असल्यामुळे त्यांची ही पगडी त्यांच्या व्यक्तीमत्वाचे वैशिष्ट्य व इतरांच्या कुतूहलाचा विषय बनला. कालांतराने लोक त्यांना पगडी या नांवाने संबोधू लागले आणि कळत नकळत त्यांचे जकाते हे आडनांव लुप्त होवून 'पगडी' हे आडनांव कालांतराने लोकप्रिय झाले. "[३]

अशा प्रकारे शेषगिरीरावांच्या काळात त्यांना प्राप्त झालेले " पगडी" हे आडनांव अद्यापही या कुटुंबात टिकून आहे.

शेषगिरीरावांचे पुत्र श्रीनिवासराव पगडी हे सुध्दा निजाम प्रशासनात अव्वल कारकून होते. श्रीनिवासराव व कृष्णाबाई या दांपत्याला एकूण ६ अपत्ये झाली.

| | | |
|---|---|---|
| १) बिंदुमाधवराव | २) सेतुमाधवराव | ३) सीताबाई |
| ४) गुरूमाधव | ५) राघवेंद्र | ६) सुशिला |

ही ती सहा अपत्ये होत.

डायऱ्यांतून नोंदी ठेवण्याची किंवा आपले विचार लिहून ठेवण्याची सवय त्यांना सतराव्या वर्षी लागली. त्यांच्या आयुष्यातील महत्वाचे कालखंड चार-पाच म्हणता येतील.

१) इ.स.१९२६-३३ : बनारस व अलाहाबाद येथील विद्यार्थी जीवन

२) इ.स.१९३३-४८ : हैदराबाद राज्यात निजामी राजवटीत नोकरी त्यातच

३) इ.स.१९४५-४८ : आदिवासी भागातील नोकरी.सामाजिक कार्य व संशोधन

४) इ.स.१९४८-५६ : पोलीस-कारवाईनंतर मुक्त हैद्राबादेतील नोकरी व संशोधन

५) इ.स.१९५६-९४ : पर्यंत मुंबईतील जीवन

डायरीतील नोंदी त्यावेळच्या जीवनातील कष्ट, उपासमार, खाजगी शिकवण्या, सोयी-गैरसोयींच्या उल्लेखाच्या आहेत. वाचनाचे तर त्यांना वेड होतेच. पण प्रत्येक ग्रंथ वाचल्यावर त्याचे नांव आणि वाचल्याची तारीखही ते नोंदून ठेवत असत. सुरूवातीला ही यादी इंग्रजी पुस्तकापुरतीच होती. नंतर त्यात मराठी पुस्तकांची नोंद झाली. उर्दू, फारसी, कन्नड, बंगाली, गुजराती व फ्रेंच या भाषांतील पुस्तकांची भर पडली.

पगडी यांचे कुटुंब धार्मिक, परंपरावादी, श्रध्दाळू होते. सरकारी नोकरीमुळे वडिलांना मिळणाऱ्या पगारावर संपूर्ण कुटुंबाचा खर्च चालत असे. दर चार किंवा पाच वर्षांनी वडिलांची बदली होत असल्यामुळे बदल्यांचा त्रास या कुटुंबाला सहन करावा लागत असे. आंध्रप्रदेश, कर्नाटक, मराठवाडा येथील बदल्यामुळे त्यांची भ्रमंती झाली व सेतुमाधवरावांना बालपणीच मोठा प्रवास घडला.

९

# पगडींचे शैक्षणिक जीवन

सेतुमाधवरावांना उर्दू माध्यमाच्या शाळेत इ.१ली मध्ये वयाच्या ५ व्या वर्षी दाखल करण्यात आले. पण वडिलांच्या बदल्यांमुळे त्यांच्या शिक्षणाची हेळसांड झाली. आपल्या प्राथमिक शिक्षणाबद्दल सेतुमाधवराव पगडी म्हणतात.

" वडिलांच्या बदलीमुळे चिंचोळीची शाळा सोडून कोंडगलच्या शाळेत दाखल व्हावे लागले. त्या शाळेत विशेष शिक्षण मिळत नव्हते. तरी घरी वडिलांनी माझ्याकडून उर्दू व मोडीचे कित्ते व्यवस्थितपणे गिरवून घेतले. शाळेत उर्दू तर घरी मराठी व कानडी या भाषांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्यामुळे मला तीन भाषा लहानपणीच सहज आत्मसात करता आल्या. याशिवाय विनायकराव मास्तर यांच्या खाजगी शिकवणुकीमुळे मला इंग्रजीचे ज्ञान प्राप्त झाले."[४]

याशिवाय त्यांचे वडील घरी फावल्या वेळात रामायण, महाभारत व भागवत वाचून घेत. वयाच्या १२ ते १३ वर्षापर्यंत पगडींनी रामायण व महाभारत यासारखे धार्मिक ग्रंथ वाचून पूर्ण केले होते. या संदर्भात स्वत: पगडी लिहितात......

"या वाचनामुळे प्रौढ, प्रगल्भ आणि संस्कृत प्रचूर मराठीची मला गोडी लागली. भारतीय वीरांच्या कथा मला आवडू लागल्या. आपल्या संस्कृतीबद्दल अभिमान निर्माण झाला."[५]

विद्यार्थी जीवनातच पगडींनी शेकडो पुस्तके वाचली. राजकीय आणि सामाजिक चळवळीकडे त्यांचे बारकाईने लक्ष असे. बनारस

आणि अलाहाबाद येथे अनेक नामवंत पुढारी त्यांना पाहण्यास मिळाले. त्यामध्ये लाला लजपतराय, महात्मा गांधी, नेहरू पिता-पुत्र, सुभाषचंद्र बोस, राजगोपालचारी, भाई परमानंद, स्वामी श्रध्दानंद, जीना इत्यादींचा समावेश होता.

काही राजकीय व सामाजिक कार्यक्रमांतही त्यांनी भाग घेतला. ओरिसा पूरग्रस्तांच्या मदतीसाठी ते इतरांच्या बरोबर झोळी घेऊन वर्गणी गोळा करीत हिंडले. सायमन कमिशनवरील बहिष्काराच्या प्रचंड मोर्चात त्यांनी भाग घेतला होता. अलाहाबादच्या ऐक्य परिषदेत ते स्वयंसेवक होते.

महात्माजींच्या दांडी यात्रेच्या प्रसंगी बनारसला चौकात प्रचंड जमाव झाला. त्यातही पगडी होते. पोलीसांनी निर्घृणपणे जमावावर आपले घोडे घातले. त्यांच्या टापांखाली ते आले होते. घोड्यांच्या टापेत आणि त्यांच्यात एका फूटाचेही अंतर नव्हते. थोडक्यात मरण टळले. असे बरेच प्रसंग त्यांच्यावर आले.[६]

घरातील धार्मिक वातावरणाचा चांगलाच परिणाम पगडी यांच्या बालमनावर झाला. गुलबर्गा येथील सरकारी शाळेत तिसरी व चौथीचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून पूर्ण झाले. त्याचबरोबर उर्दू व फारसी शिक्षणाचा पायाही प्राथमिक अवस्थेतच पक्का झाला. त्याच सुमारास घरी खाजगी शिक्षकाकडून मराठी भाषेचे शिक्षण त्यांना मिळाले. त्यामुळे सेतुमाधवराव पगडी हे अन्य महाराष्ट्रीय इतिहासकारांच्या तुलनेने खूपच सुदैवी ठरले.

इ.स. १९२२ ते इ.स.१९२५ या तीन वर्षांच्या कालखंडात पगडी पुण्याला होते. तेथेच ते मॅट्रिकची परीक्षा पास झाले. निजाम राज्यातील वातावरणातून बाहेर पडून पुणे येथील पुरोगामी वातावरणात घालवलेली तीन

वर्षे पगडींच्या जीवनाला कलाटणी देणारी ठरली. मराठीची खरी आवड त्यांना पुणे येथेच निर्माण झाली. पुण्याचे मोठेपण सांगताना पगडी म्हणतात....

''आमच्या चार पिढ्या महाराष्ट्राबाहेर गेल्या होत्या. पुण्यामुळे मला महाराष्ट्राची पुन्हा ओळख झाली. निदान शंभर तरी मराठी पुस्तके वाचून झाली. धर्मासंबंधीच्या आत्यंतिक मतांना तडे गेले. आपटे, गडकरी, अनंततनय, कवि विनायक इत्यादी साहित्यिकांची नांवे कानावरून गेली. चांगले वक्ते आणि पुढारी पाहण्यास मिळाले. मराठ्यांच्या इतिहासाबद्दल गोडी लागली. सारांश, जन्मभर पुरेल इतकी शिदोरी मला पुण्यास लाभली. आणखी काय हवे होते.''[७]

इ.स. १९२५ मध्ये सेतुमाधवरावांचे वडील सेवानिवृत्त झाले. वडिलांची पेन्शन फार कमी होती. त्यात बहिणीचे लग्न झाले. त्यामुळे कुटुंबाची आर्थिक स्थिती नाजूक बनली. मोठे बंधू बिंदुमाधवराव हैदराबादच्या कॉलेजात शिकत होते. म्हणून सेतुमाधवरावांनी पण हैदराबादलाच शिकावे असा त्यांच्या वडिलांनी निर्णय घेतला. त्यामुळे सेतुमाधवरावांना पुणे सोडावे लागले. पुढे पुढे वडिलांची आर्थिक स्थिती बिघडतच गेली. दोन्ही मुलांचा शिक्षणाचा खर्च वडिलांना पेलवेना. त्यामुळे वडिलांची तारांबळ उडाली. उच्च शिक्षण घेण्याची त्यांची महत्वाकांक्षा त्यांना गप्प बसू देत नव्हती. शेवटी त्यांनी असा निर्णय घेतला की, बनारस येथे जाऊन स्वकष्टाने पुढील शिक्षण पूर्ण करावे. घरात कोणालाही कसलीही कल्पना न देता एकेदिवशी वडिलांनी धान्य आणण्यासाठी दिलेले पंचवीस रूपये घेवून सेतुमाधवरावांनी परस्पर गुलबर्गा शहर सोडले व बनारस येथे जाण्याचा त्यांचा प्रवास सुरू झाला. त्यावेळची त्यांची मानसिकता कशी होती त्याचे वर्णन ते पुढीलप्रमाणे करतात......

''मी घाईघाईने गाडीत बसलो. खिशात वीस रूपये असावेत. या पलीकडे माझ्याजवळ काही नव्हते. आपण बनारसला कसे पोहोचू आणि तेथे आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे. याचा विचार करण्याच्या मन:स्थितीत मी नव्हतो. फक्त एकच विचार मनात सारखा चालू होता. '' घर सोडा आणि स्वत:च्या पायावर उभे राहून आपले नशीब काढा.''[८]

यावरून पगडी यांना उच्च शिक्षणासाठी अतिशय वाईट स्थितीतून मार्ग काढावा लागला हे लक्षात येते. तरीसुध्दा '' जिद्द, धाडस आणि चिकाटी '' असेल तर कोणत्याही परिस्थितीतून मार्ग काढणे शक्य होते. बनारस विद्यापीठात त्यांनी बी.ए.साठी प्रवेश मिळविला. प्रा.परशुराम नारायण पाटणकर यांचा त्यांना आधार मिळाला. जेवणाची सोय मात्र अनिश्चित होती. एकवेळच्या जेवणावर त्यांनी अनेक दिवस काढले. एका अर्थाने त्यांना हा प्रदीर्घ उपवासच घडला.

## राज्यशास्त्रात एम्.ए.

जिद्द व प्रामाणिकपणामुळे अपार कष्ट करून पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी घेतले. इ.स. १९३० मध्ये बनारस विद्यापीठात बी.ए.च्या परीक्षेत सर्वप्रथम येण्याचा मान त्यांनी पटकाविला आणि त्यांना ''रायचंडीप्रसाद सुवर्णपदक'' मिळाले. तसेच अलाहाबाद विद्यापीठात एम्.ए. च्या शिक्षणासाठी दरमहा साठ रूपयांची बिर्ला शिष्यवृत्ती मिळाली. तेव्हा त्यांना खूप आनंद झाला आणि घर सोडल्याचे व आतापर्यंत भोगलेल्या कष्टाचे चीज झाल्यासारखे वाटले. इ.स. १९३२ मध्ये ते राज्यशास्त्र हा विषय घेऊन एम्.ए. झाले. अनेक चांगल्या

वर्गमित्रांच्याकडून त्यांना अनेक चांगल्या गोष्टी शिकता आल्या. अलाहाबादच्या नावाजलेल्या विद्वान प्राध्यापकांच्या सहवासामुळे पगडींच्या ज्ञानात खूपच भर पडली. राज्यशास्त्र विषय असून देखील त्यांनी ऐतिहासिक संशोधनाच्या क्षेत्रात मोलाची कामगिरी केली. विद्यार्थ्यांना इतिहास विषयाच्या अभ्यासाची गोडी लावून दिली.

## संशोधनाची प्रेरणा

एम्.ए.(राज्यशास्त्र) ते प्रथम श्रेणीत पास झाले आणि आपल्या कष्टाचे चीज झाल्याचा आनंद होऊन त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. अलाहाबाद विद्यापीठातील नामवंत प्राध्यापकांमध्ये प्रा.रंगनाथ झा, गुरूदेव रानडे, डॉ.ईश्वरीप्रसाद, डॉ.ताराचंद, डॉ.वेणीप्रसाद इत्यादी नावाजलेल्या व तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे सेतुमाधवराव पगडी यांची अभ्यास करण्याची दिशा बदलली आणि प्रत्येक गोष्ट ते चिकित्सकपणे अभ्यासू लागले. याविषयी पगडी स्वत: लिहितात....

''अलाहाबाद विद्यापीठातील प्राध्यापक विद्यार्थ्यांना मूळ साधने वाचण्यास भाग पाडीत. त्यामुळेच विषयाची मूळ साधने तपासून घेण्याची सवय मला तिथेच लागली. तेथील एकूण वातावरणच चिकित्सक दृष्टी वाढविण्यासाठी मोठे अनुकूल होते. अलाहाबाद विद्यापीठातील वातावरणातून मला संशोधन करण्याची प्रेरणा मिळाली.''[९]

डॉक्टर बेनीप्रसाद यांच्या मार्गदर्शनाखाली पगडींचे संशोधन सुरू झाले. त्यांच्या संशोधनाचा विषय होता. '' हैद्राबादची राज्यघटना आणि

राज्यव्यवस्था यांचा इतिहास '' (अॅडमिनिस्ट्रेटिव्ह अॅन्ड् कॉन्स्टिट्यूशनल हिस्ट्री ऑफ हैदराबाद ) त्यामुळे हैदराबादच्या इतिहासाचे त्यांचे संशोधन सुरू झाले. त्या निमित्ताने त्यांनी अनेक इंग्रजी, उर्दू आणि फारसी ग्रंथ वाचून काढले.

एम्.ए. झाल्यानंतर डॉ. धर्मानंद कोसंबी यांच्या निमंत्रणावरून पगडी अलीगडला गेले. अलीगड मुक्कामी असताना अलीगड विद्यापीठात इतिहासाचे गाढे अभ्यासक प्रा.महंमद हबीब यांच्याकडे अनेकवेळा जाऊन त्यांनी इतिहासावर भरपूर चर्चा केली. धर्मानंद कोसंबी यांच्याशीही त्यांनी चर्चा केली. मॅकेव्हलीच्या ''प्रिन्स'' या ग्रंथाचे मराठी अनुवाद करण्याचे काम कोसंबीनी पगडींवर सोपविले. परंतु कोसंबी व पगडी या दोघांच्या स्वभावातील अंतरामुळे ते एकमेकांना जवळ करण्याऐवजी दूरच करत गेले. शेवटी अनुवादाचे काम अर्धवट टाकून ते परतले. परंतु तोपर्यंत ऐतिहासिक संशोधनाची दृष्टी त्यांना लाभली होती.[१०]

तहसिलदाराच्या प्रशिक्षणासाठी इ.स.१९३३ मध्ये पगडी वारंगळला हजर झाले. त्याच कालावधीत उषा नामक पुणतांबेकर या विद्वान प्राध्यापकाच्या कन्येशी त्यांचा विवाह झाला. (इ.स.१९३३) आपल्या पत्नीविषयी कृतज्ञतापूर्वक पगडी लिहितात......... उषा पगडी यांनी काही कथा हैदराबादच्या ''निजामविजय'' या नियतकालिकातून लिहिल्या आहेत. याशिवाय त्यांचे ''कल्पना''(इ.स.१९४०) आणि ''अंजली''(इ.स.१९४२) हे दोन कथासंग्रह प्रसिध्द असून '' सुवर्णमध्य'' (इ.स.१९४३) या कादंबरीत त्यांनी स्त्री स्वातंत्र्यावर भर दिला आहे. माझ्या लेखन साहित्यात त्यांनी सहचारिणी म्हणून अमूल्य सहकार्य केले आहे. [११]

संसारी जीवनाचा भरपूर आनंद घेवून, भरपूर लिखाण व

संशोधन सेतुमाधवराव पगडींनी केले. त्यामुळे राजवाडे, खरे तसेच सरदेसाई या त्यांच्या समकालीन इतिहासकारांपेक्षा ते संसारी जीवनात भाग्यशाली ठरले.

## निजामाची नोकरी

इ.स.१९३३ ते इ.स.१९४८ या कालावधीत पगडी निजाम प्रशासनात मामलेदार, उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी, असिस्टंट कमिशनर इत्यादी महत्वाच्या पदावर काम करीत होते. निजाम राजवटींत सर्व सत्ता अल्पसंख्यांक मुस्लीमांच्या हाती केंद्रीत झाली होती. मुस्लीम अधिकारी हिंदू धर्मीयांच्याबाबत उदासिनता दाखवित आणि हिंदूंच्याकडे तिरस्कारी नजरेने पाहात असत. यातून पगडी सुध्दा सुटले नाहीत. हैदराबाद राज्यातील अशा गढूळ वातावरणात श्री. पगडींनी पंधरा वर्षे काढली. तरी ते मुसलमान अधिकाऱ्यांना कधीही घाबरत नसत. पगडी यांचा स्वभाव निर्भिड व स्वाभिमानी होता. स्पष्टवक्तेपणा हा त्यांच्या स्वभावातला महत्वाचा गुण होता. आपला अनुभव कथन करताना पगडी लिहितात......

माझ्या सडेतोड वागणुकीमुळे दंड व महसूल खात्याचे वरिष्ठ अधिकारी माझ्यावर रूष्ट झालेले होते. मी ही त्याची पर्वा करीत नव्हतो. मी आपले काम चोख करीत होतो. त्यामुळे मला मुसलमान अधिकाऱ्यांना भिऊन वागण्याचे मुळीच जमत नव्हते.

मार्च १९३३ च्या पहिल्या आठवड्यात तहसिलदार म्हणून पगडींची निवड झाली. हीच त्यांची पहिली नोकरी. या त्यांच्या नेमणुकीने त्यांच्या आई-वडिलांना अतिशय आनंद झाला. १० एप्रिल १९३४ ला तेलंगणात मेदक

जिल्ह्यातील जोगीपेठ येथे मामलेदार म्हणून नेमणूक झाली. नंतर ६ एप्रिल १९४६ रोजी पगडींची डेप्युटी कलेक्टर म्हणून आसफाबाद येथे नेमणूक झाली. पुनर्वसन खात्यात ते असतानाच १९४८ साल संपले.

हे वर्ष त्यांना विलक्षणच गेले. इ.स. १९४८ च्या एप्रिलपर्यंत ते आसफाबादेस डेप्युटी कलेक्टर आणि आदिवासी कल्याण विभागाचे अधिकारी होते. सोळा सप्टेंबरपर्यंत सर्व्हे सेटलमेंट खात्यात असिस्टंट कमिशनर होते. ऑक्टोबर अखेरपर्यंत मंत्र्याचा आणि सचिवांचा पर्सनल असिस्टंट होते. नंतर बदली मिळून ते डेप्युटी सेक्रेटरी झाले. त्यावेळी त्यांचा पगार दरमहा नऊशे रूपये झाला.

इ.स. १९४९ च्या एप्रिल महिन्यात त्यांची नेमणूक रेव्हेन्यू खात्यात डेप्युटी सेक्रेटरी म्हणून झाली.

इ.स. १९४८ ते इ.स.१९५० नायब सचिव, आय्.ए.एस्. म्हणूनही त्यांनी काम पाहिले. इ.स.१९५० च्या जूनमध्ये वेलोडींच्या मंत्रीमंडळात काँग्रेस पक्षीय मंत्री घेण्यात आले. बी.रामकृष्णराव महसूल मंत्री झाले. याच वर्षी दिल्लीहून फेडरल पब्लिक सर्व्हिस कमिशन हैदराबादेस आले. हैदराबादच्या निवडक अधिकाऱ्यांना 'इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस (आय्.ए.एस्.) मध्ये घेण्यासाठी हे कमिशन आले होते. पहिल्याच इंटरव्ह्यूत हैद्राबादचे जे तेरा अधिकारी आय्.ए.एस्.मध्ये निवडण्यात आले, त्यात सेतुमाधवराव पगडीही होते. रूपये ८०० ते १८०० ग्रेडमध्ये त्यांची नेमणूक झाली. इ.स.१९५१ मध्ये औरंगाबादचे प्रशासक ल.ग.राजवाडे, आय्.सी.एस्., हे हैदराबाद राज्याचे मुख्य सचिव झाले आणि त्यांच्या जागी औरंगाबादचा कलेक्टर म्हणून सेतुमाधवरावांनी चार्ज घेतला.

नोकरी करीत करीत त्यांनी संशोधन व लेखनाचे काम केले. लेखन करणे हा त्यांचा आवडता छंद होता. औरंगाबाद या ठिकाणी जिल्हाधिकारी म्हणून त्यांची नेमणूक झाली असताना त्यांनी मनाला समाधान वाटणाऱ्या अनेक गोष्टी केल्या. ते औरंगाबादचे लोकप्रिय अधिकारी बनले. औरंगाबादचे वर्णन करताना पगडी म्हणतात......

''औरंगाबादेत मी एक वर्षात जे काही करू शकलो, त्याचे मला समाधान वाटते. शहर सुधारणा, सुफी पंथाचे संशोधन, महानुभाव वाङ्मयाचा अभ्यास, दीडशे वाचनालयांची स्थापना इत्यादी कामात मी वर्षभर झटत होतो. मराठवाड्यातील दिलदार आणि प्रेमळ जनतेचा मला जो परिचय लाभला त्यामुळे त्या समाजपुरूषाचे मला मोठे हृदयदर्शन घडले. त्यांची सेवा करण्यात मला साफल्य लाभले. ती आठवण मी आपली अमूल्य ठेव समजतो.''[१२]

इ.स.१९५२ च्या जून महिन्यात त्यांची हैदराबाद येथे रेव्हेन्यू बोर्डाचा सेक्रेटरी म्हणून नेमणूक झाली. १९५३ साली पगडींची नेमणूक शिक्षण खात्याचा संचालक म्हणून झाली. ८ मे, १९५३ रोजी हैदराबादेत मराठवाडा मराठी साहित्य परिषदेचे पाचवे अधिवेशन झाले. त्या परिषदेचे अध्यक्षपद पगडींना देण्यात आले होते. अध्यक्षीय भाषणाला महाराष्ट्रातील वर्तमानपत्रांतून चांगलीच प्रसिध्दी मिळाली. त्यांच्या सूचनेप्रमाणे साहित्य परिषदेचे मासिक 'प्रतिष्ठान' हे सुरू करण्यात आले.

शिक्षण खात्याचा संचालक म्हणून त्यांनी दोन अडीच वर्षे काम केले. शिक्षण खात्याचा संचालक म्हणून त्यांनी पुण्याला भरलेल्या भाषा संमेलनात भाग घेतला. त्याचबरोबर संचालक या नात्याने हैदराबाद राज्यातील सतराच्या सतरा जिल्ह्यांतून ते फिरले.

आपली सरकारी नोकरी प्रामाणिकपणे करून होईल तेवढी समाजसेवा त्यांनी केल्याचे दिसते. यावरून त्यांचा सेवाभावी दृष्टीकोन दिसून येतो.

## मुंबईतील सचिवपदाची कारकिर्द

इ.स.१९५६ च्या नोव्हेंबर महिन्यात त्यांना इच्छा नसतांना मुंबई प्रांतात जावे लागले. राज्यपुनर्रचना झाल्यावर त्यांना मुंबई राज्यात पाठविण्याचा निर्णय निजाम प्रशासनाने घेतला होता. हैदराबाद मध्ये राहावयास मिळावे यासाठी त्यांनी खूप खटपट करून पाहिली, पण त्यात त्यांना यश आले नाही. शेवटी खिन्न मनाने ५ नोव्हेंबर, १९५६ रोजी त्यांना हैदराबाद सोडून मुंबईला जावे लागले.

महाराष्ट्र राज्य सचिव म्हणून नेमणूक होण्याऐवजी शिक्षण खात्याचा उपसचिव म्हणून त्यांची नेमणूक झाली. हैदराबादला सचिवपदी असलेल्या व्यक्तीला येथे उपसचिवपदी नेमण्याचा हा प्रकार त्या व्यक्तीची पदावनतीच होती आणि ही बाब पगडींच्यादृष्टीने अपमानास्पद ठरली. हा अपमान पगडींनी निमूटपणे गिळला. कारण तक्रार करून न्याय मागण्यासाठी येथे त्यांची जिव्हाळ्याची माणसे नव्हती. सुमारे दोन वर्षानंतर त्यांची सेवाजेष्ठता मंजूर होऊन त्यांना सचिवपद देण्यात आले. [१३]

१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. पगडींना सचिवपदाचा हुद्दा देण्यात आला. त्याचबरोबर महाराष्ट्र दर्शनिकेचा कार्यकारी संपादक म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. तेव्हापासून २७ ऑगस्ट, १९६९ पर्यंत म्हणजे सेवानिवृत्तीच्या काळापर्यंत ते याच पदावर होते. [१४]

आपली जबाबदारी त्यांनी चोखपणे व प्रामाणिकपणे पार पाडली. प्रशासनात असताना कधीही कोणत्याही मोहाला ते बळी पडले नाहीत. सचिवालयाच्या मुख्य इमारतीत जुने ग्रंथ व फाईलींच्या ढिगाऱ्यात ते डुंबून गेले. प्राप्त परिस्थितीचा योग्य तो फायदा उचलून वाचन, लिखाण, व्याख्यानातून स्वत:च्या ज्ञानात प्रचंड भर तर त्यांनी घातलीच, त्याचबरोबर राज्याराज्यात त्यांचा नांवलौकिकही झाला. निजाम राजवटीत त्यांची हरप्रकारे कुचंबणा होत होती. ती मुंबईने मात्र दूर केली. मुंबईत आल्याने माझे जीवन धन्य झाले असे एकदा पगडी म्हणाले होते.

## पगडी यांचे कौटुंबिक जीवन

बनारसला शिकत असताना प्रा.बाबासाहेब पुणतांबेकर यांची मुलगी सुशीला ( सासरची उषा ) हिच्यावर त्यांचे एकतर्फी प्रेम बसले होते. नोकरीला लागल्यानंतर लग्न करण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. शेवटी प्रयत्नांना यश मिळाले आणि सुशीला ही सेतुमाधवरावांची पत्नी बनली आणि सुदैवाने पदवीधर झालेल्या या स्त्रीने थोड्याच दिवसात सासरकडील माणसांची मने जिंकून घेतली. याबाबतीत पगडी फार सुदैवी ठरले. म्हणूनच ते आपल्या जीवनात यशस्वी झाले. कौटुंबिक सुख देणारी पत्नी त्यांना मिळाली. आपल्या जीवनात भाग्योदय झाला. म्हणून पगडींनी माहेरचे सुशीला हे नांव बदलून उषा हे नांव ठेवले. उषाताई ह्या अपेक्षेप्रमाणे खरोखरच पगडींच्या कौटुंबिक जीवनातील उष:काल ठरल्या. आपल्या पत्नीबाबत पगडी असे म्हणतात......

''माझ्या मनासारखी पत्नी लाभल्यामुळे माझे जीवन बदलून गेले. मनासारखी नोकरी नाही म्हणून जी खंत होती तिचा मला विसर पडला.''[१५]

पगडींनी आपल्या पत्नीला कधीही दुखविले तर नाहीच, उलट तिच्या सर्व इच्छा पूर्ण करून तिला नेहमी आनंदी ठेवण्याचा प्रयत्न केला. पत्नीप्रमाणे पगडींनी आपल्या मुलांवरही खूप प्रेम केले. त्यांना मारणे तर सोडाच पण कधी ते त्यांच्यावर रागावले सुध्दा नाहीत. ते आपल्या पत्नीला म्हणत की, मुलांना स्वप्नांतही फुलांच्या छडीने सुध्दा मारू नका. अशा प्रकारे पगडी कुटुंब म्हणजे अत्यंत भावनाशील व प्रेमळ कुटुंबाचे एक आदर्शच होते. सेवानिवृत्त होण्यापूर्वी त्यांच्या सर्व मुलामुलींचे शिक्षण पूर्ण होवून लग्नेही झाली. त्यामुळे सर्व प्रकारच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यातून ते तसे मुक्त झाले होते. सेवानिवृत्तीनंतरचे जीवन आपल्या मुलाबाळांत व नातवंडात आनंदाने व्यतीत करण्याचे भाग्य त्यांना लाभले. आपल्या कौटुंबिक जीवनाचा आढावा घेतांना पगडी यांच्या पत्नी उषाताई म्हणतात......

''आमच्या आयुष्यातील ५०-६० वर्षे कशी गेली हे कळले सुध्दा नाही. सुखसमृध्दीने न्हालो, दु:ख आणि विशादाने पोळलो, पण घरातील आनंद, समता आणि प्रेमळ छत्ररूपी ऋध्दी-सिध्दी आमच्या घरी पाणी भरत होत्या.''[१६]

सेवानिवृत्तीनंतर पगडींनी स्वत:ला इतिहास संशोधन क्षेत्रात झोकून दिले. भरपूर प्रवास, व्याख्याने व लिखाणाचा सपाटा त्यांनी सुरू केला होता. वयाच्या ऐंशी वर्षानंतर त्यांची प्रकृती जरी ढासळत गेली तरी त्यांनी आपली ज्ञानसाधना चालूच ठेवली. शेवटी १४ ऑक्टोबर,१९९४ रोजी सकाळी साडे अकराच्या सुमारास त्यांनी जगाचा निरोप घेतला.

पतीच्या निधनानंतर केवळ तीनच दिवसांनी उषाताईने सुध्दा जगाचा निरोप घेतला.

पगडी यांनी इतर सर्व संसारीक माणसांप्रमाणे संसार केला

आणि स्वत:ची कौटुंबिक जबाबदारी पार पाडण्यासाठी प्रदीर्घ काळ सरकारी नोकरीही केली. पगडींनी आपल्या जीवनाचा हेतू केवळ स्वत:च्या कौटुंबिक जीवनापुरताच मर्यादित करून ठेवला नव्हता तर राष्ट्रीय घडामोडी आणि समाज जीवनातील स्थित्यंतरे याकडे त्यांनी अगदी डोळसपणे पाहिले. सभोवतालची परिस्थिती, व्यक्ती व प्रसंग यातून त्यांच्यावर जे संस्कार झाले त्यातूनच त्यांचे ज्ञानी व क्रियाशील व्यक्तित्व आकार घेत गेले.

## लेखक म्हणून पगडींचे व्यक्तिमत्व

सेतुमाधवराव पगडी यांचे जीवन म्हणजे नुसती वाहती ज्ञानगंगा होय. ते अखंड ज्ञान देण्यास व ग्रहण करण्यास आसुसलेले असत. अखंड वाचन, लेखन आणि चिंतन याशिवाय त्यांना कसलीही सवय नव्हती. ती त्यांची त्रिसूत्री होती.

डिसेंबर, १९५६ मध्ये सरकारतर्फे नाट्यमहोत्सव सुरू झाला. नाटकाचा परीक्षक म्हणून पगडींची नेमणूक करण्यात आली. 'उर्दू गजल शायरीची मुशाफिरी' हा पगडींचा पहिला लेख 'लोकसत्ता' साप्ताहिक अंकात ३ फेब्रुवारी, १९५७ रोजी प्रसिध्द झाला. त्यानंतरच लोकसत्तेत त्यांची उर्दू कविंच्यावर लेखमाला सुरू झाली.

उर्दू कवी श्रेष्ठ गालिब यांचा समग्र उर्दू गजलांचा पगडींनी केलेला मराठी अनुवाद इ.स. १९५८ मध्ये प्रसिध्द झाला. इ.स. १९५७ मध्ये सरकारने मराठवाडा विद्यापीठ कमिशन नेमले त्या कमिशनचे पगडी सभासद सचिव होते.

इ.स. १९६० मध्ये महाराष्ट्र शासनाने साहित्य संस्कृती मंडळ

स्थापन केले. त्या मंडळाचा सभासद सचिव म्हणून पगडींची नेमणूक करण्यात आली. इ.स. १९६० मध्ये गॅजेटिअर बोर्ड, साहित्य-संस्कृती मंडळ या खात्यांच्या जोडीने त्यांना नाट्य पूर्व परीक्षण मंडळाचा अध्यक्ष नेमण्यात आले. १९६० सालापासूनच आलमगीरच्या दिवाळी अंकासाठी त्यांनी लेख लिहिण्यास सुरूवात केली. ललित साहित्याचा अभ्यासक म्हणून त्यांनी कथा, कादंबऱ्या, काव्ये, नाटके इत्यादींचा भरपूर आस्वाद घेतला. स्थूलमानाने १९५७ सालापासून त्यांनी इतिहास लेखनास प्रारंभ केला असे म्हणता येईल. इतिहासाच्या अभ्यासाला उपयुक्त ठरणारी उर्दू व फारसी मधील साधने मराठीत अनुवादित करण्याची अत्यंत महत्वाची कामगिरी पगडींनी पार पाडली. " भारतीय इतिहास आणि संस्कृती" या ऐतिहासिक संशोधनाला वाहिलेल्या त्रैमासिकात श्री पगडी यांचे ऐतिहासिक संशोधनावर आधारित एकूण ४३ लेख प्रसिध्द झाले आहेत. १९७४ साली त्यांनी 'छत्रपती शिवाजी' हा इंग्रजी ग्रंथ लिहिला. तो ग्रंथ विद्वतमान्य तर झालाच परंतु नॅशनल बुक ट्रस्ट या संस्थेने त्या ग्रंथाचे अन्य भारतीय भाषांमध्ये संक्षिप्त अनुवाद प्रकाशित केले आहेत.

ज्ञानार्जनासाठी ते कोणत्याही एका भाषेवर अवलंबून राहिले नाहीत. वेगवेगळ्या भाषांचे ज्ञान त्यांनी अवगत केले होते. सेवानिवृत्तीनंतर एखादा मनुष्य आरामात बसला असता, परंतु दिवस-दिवस वाचन व लेखन करणारे पगडी हे खरे विद्वान संशोधक होते. मराठी व इंग्रजी या भाषांप्रमाणेच उर्दू, फारसी, कन्नड, तेलगू, हिन्दी, बंगाली, गोंडी व कोलमी इत्यादी भाषा त्यांना बोलता व लिहिता येत होत्या.

साहित्य व इतिहास संशोधन या क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य बहुमोल आहे. ४० कवी, २५ आत्मचरित्रकार, १० विनोदी लेखक आणि २५

प्रबोधनकार अशा १०० उर्दू साहित्यिकांचा परिचय महाराष्ट्राला पगडी यांचेमुळे झाला. उर्दू आणि फारसी भाषेवर आधारलेली एकूण १२ पुस्तके त्यांनी लिहिली. साहित्य व इतिहास या दोन्ही विषयांची मिळून जी ६४ पुस्तके त्यांनी लिहिली त्यापैकी पन्नास पुस्तके मराठी व चौदा पुस्तके इंग्रजीत आहेत. विविध मासिक व दैनिकातून त्यांनी अंदाजे एक हजाराच्यावर लेख लिहून प्रसिध्द केले आहेत. मराठी साहित्यात त्यांचे काव्यपरीक्षण, कथासंग्रह, निबंध लेखन, वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांनी उर्दू व फारसी साहित्यिकांचा मराठी जनतेला परिचय करून दिला. मोगल दरबारातील बातमीपत्रे, व मोगल सरदारांच्या पत्रव्यवहाराचा सुमारे पाच हजार पाने भरतील एवढा फारसी मजकूर मराठीत अनुवादीत केला.

केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही जवळजवळ ९० ठिकाणी ते गेले. दीड लाख मैलांचा त्यांनी प्रवास केला. सरकारी कामे, व्याख्याने व ऐतिहासिक स्थळांना भेटी देणे या कारणास्तव पगडींनी भारतभर भ्रमण केले. एक हजार पाचशे इतकी व्याख्याने त्यांनी दिली. त्यातील काही साहित्यावरची होती. काही ऐतिहासिक होती. तर काही समाजप्रबोधनपर अशी होती. एक व्यक्ती ज्ञानाच्या अनेक शाखात विद्वत्ता प्राप्त करून सहज वावरू शकते याचे प्रत्यंतर पगडी यांच्या व्यक्तिमत्वावरून येते. ते विद्वान तर होतेच पण त्यांना आपल्या विद्वतेचा गर्व नव्हता.

पगडी एक्क्याऐंशीव्या वर्षात पदार्पण करीत असताना महाराष्ट्र शासनाने या नामांकित इतिहासकाराचा भारताचे तत्कालीन उपराष्ट्रपती डॉ.शंकरदयाळ शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली एका भव्य समारंभात सत्कार केला. राज्य शासनाने त्यांच्या नावाची शिष्यवृत्ती मुंबई विद्यापीठात सुरू केली.तसेच पुण्याच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठात त्यांच्या नांवे एका अध्यासनाची निर्मिती

करण्यात आली आहे.

कै.नरहर कुरूंदकर यांनी सेतुमाधवराव पगडी यांच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

"पगडी यांचे व्यक्तिमत्व बहुरंगी व बहुढंगी आहे. अतिशय रसिक, जिज्ञासू आणि चिकित्सक असे जीवन ते जगलेले आहेत. ज्या बाबी एखाद्या महाराष्ट्रीय माणसात अतिशय दुर्मिळ आहेत अशा अनेक बाबींचा समन्वय पगडींच्या आयुष्यात झाला आहे. जुन्या कानडी प्रांतात ते जन्मले असले तरी कोणत्याही प्रकारचे कानडीपण त्यांच्याजवळ नव्हते. पगडी एका बाजूने इतिहासाचे प्रकांड पंडित आणि दुसऱ्या बाजूने म्हणजे दिलखुलास गप्पा-गोष्टी करणारे मराठमोळे गृहस्थ, रसाळ वक्तृत्व आणि तेवढाच विनोदी गोष्टींचा भरणा, यामुळे मित्रांच्या बैठकीत पांडित्याची महावस्त्रे बाजूला ठेवून हसत गप्पा मारीत राहणे हा त्यांचा नित्य सवयीचा भाग."[१७]

अतिशय कष्टातून त्यांनी ज्ञानसाधना केली आणि आपला स्वाभिमानही जपला. अनेक मानापमानाचे प्रसंग आले पण ते डगमगले नाहीत. लाचार बनले नाहीत. हल्लीच्या काळात कित्येक लेखक, कवी, कलावंत पैशापुढे लाचारी पत्करतांना दिसतात. परंतु पगडी हे शेवटपर्यंत कोणत्याही अमिषाला बळी पडले नाहीत. या संदर्भात महाराष्ट्राचे जेष्ठ पत्रकार व साहित्यिक कै.विद्याधर गोखले यांनी काढलेले उद्गार महत्वाचे आहेत, ते म्हणतात......

"पगडी व्यावसायिक इतिहासकार नव्हते. बऱ्याचदा चर्चेतून हा विषय ऐकावयास मिळतो. खरे तर विद्यापीठ किंवा महाविद्यालयातून इतिहासाचे अध्ययन, अध्यापन करणारे म्हणजे त्यांना रूढ अर्थाने व्यावसायिक इतिहासकार म्हणण्याची पध्दत आहे असा नियम लागू केल्यास ग.ह.खरे, पारसनीस, वि.का.

राजवाडे, ग्रँट डफ इत्यादी इतिहासकार कोणत्याही विद्यापीठात तसेच महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून अध्यापनाचे काम करीत नव्हते. तेव्हा त्यांना जर इतिहासकार म्हणणार असू तर सेतुमाधवराव पगडी यांना सुध्दा इतिहासकार मानणे भागच आहे. इतिहासाचे अध्यापन करणे किंवा इतिहासावर पुस्तके लिहिणे म्हणजे इतिहासकार नव्हे, तर घडलेल्या गोष्टींचे संशोधन करून ते वास्तव स्वरूपात जगासमोर आणणे म्हणजे इतिहासकार होय.

वास्तविक पगडी हे फार मोठे साहित्यिकच व्हायचे पण ते योगायोगाने इतिहासाकडे वळले. आयुष्यभर ते दोन्ही क्षेत्रात वावरत राहिले. प्रचंड बुध्दीमत्ता व कष्ट करण्याची तयारी असल्यामुळे पगडी यांना ऐतिहासिक क्षेत्रात मोलाची कामगिरी करता आली. अठराव्या शतकात मराठ्यांनी आपला पराक्रम व कर्तृत्वाने अखिल भारतीय पातळीवर जी कामगिरी करून दाखविली ते भारताच्या इतिहासातील एक अविस्मरणीय प्रकरण बनले आहे.''[१८]

केवळ मराठ्यांच्या इतिहासावरच त्यांनी भर दिला नाही तर अखंड प्रवास, यामधूनच निरनिराळे विषय त्यांना सुचत गेले व ते त्यावर लिहित गेले.

सेतुमाधवराव पगडींनी इतिहासविषयक कांही ग्रंथांना अत्यंत उपयुक्त प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्यांनी प्रसंगोपात काही इतिहासविषयक ग्रंथांचे परीक्षण सुध्दा लिहिलेले आढळते.

## संदर्भ व तळटीपा

१) पगडी सेतुमाधवराव, जीवनसेतु ( आत्मचरित्र ) पृ.१
२) मंजुळ वा.ल. दैनिक तरूण भारत, पुणे दिनांक: ११ फेब्रुवारी, १९८८, पृ.५
३) जीवनसेतु, पृ.१०१
४) कित्ता, पृ.१९
५) कित्ता, पृ.११
६) कित्ता, पृ.२०१
७) कित्ता, पृ.९६
८) कित्ता, पृ.१२०
९) कित्ता, पृ.२२१
१०) कित्ता, पृ.२५६
११) देशपांडे सुरेश रघुनाथ, मराठीशाहीचे आधुनिक भाष्यकार, पृ.१५६
१२) जीवनसेतु, पृ.५७१
१३) कित्ता, पृ.५९८
१४) कित्ता, पृ.६०२
१५) कित्ता, पृ.३१२
१६) पगडी सेतुमाधवराव, तन्वी-श्यामा, पृ.१३
१७) नरहर कुरूंदकर, 'ज्वाला' दिवाळी अंक, नोव्हेंबर, १९८०, पृ.११
१८) गोखले विद्याधर, 'दै.सामना' मुंबई, २३ ऑगस्ट, १९९४, पृ.५